# श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखाना लि.सोमेश्वरनगर

ता. बारामती, जि.पुणे

जा.क्र./ऊसविकास/बक्षीस योजना/३७३६/२०१७-१८ दि.०७/११/२०१८

## परिपत्रक

सभासद शेतकऱ्यांच्या एकरी ऊस उत्पादनात वाढ होऊन कार्यक्षेत्रातुन जास्तीत जास्त ऊसाचे उत्पादन व्हावे व कार्यक्षेत्रातील उपलब्ध ऊस बाहेरील कारखान्यांना अथवा गुळगुळीताला जाऊ नये या उद्देशाने सभासदांसाठी प्रोत्साहनपर बक्षिस योजना ही गळीत हंगाम सन २०१७-१८ पासुन जाहिर केलेली आहे. त्यासाठी खालील प्रमाणे माहिती व नियम आहेत.

अ) एकरी जास्तीत जास्त ऊस उत्पादन घेणाऱ्या सभासदांसाठी (लागण हंगामानुसार बक्षीस रक्कम रू.)

| अ.नं. | बक्षीस | आडसाली | पुर्व हंगामी | सुरू | खोडवा |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रथम क्रमांक | २५०००/- | २५०००/- | २५०००/- | २५०००/- |
| २ | व्दितीय क्रमांक | १५०००/- | १५०००/- | १५०००/- | १५०००/- |
| ३ | तृतीय क्रमांक | १००००/- | १००००/- | १००००/- | १००००/- |

## बक्षीस योजना नियमावली

१) ऊस उत्पादक शेतकरी कारखान्याचा सभासद असावा.

२) ऊस उत्पादक सभासदाने या योजनेमध्ये भाग घेणेसाठी रक्कम रू.१००/- प्रवेश फी ही ऊस लागणी नंतर व तोड येणे पुर्वी कारखान्याकडे भरून नांव नोंदणी करणे आवश्यक आहे.

३) ऊस उत्पादक सभासदाची किमान अर्धा एकर ऊस नोंद असणे आवश्यक आहे.

४) या योजनमध्ये भाग घेतेलेल्या ऊस उत्पादक सभासदांनी कुंटुंबातील सर्व ऊस आपले कारखान्याकडे गळीतासाठी पाठवीणे बंधनकारक आहे.

५) एका वर्गवारीच्या प्रवेश नोंदणीकरिता एकाच गटातुन / वर्गवारीतुन एकदाच पुरस्कारास पात्र धरणेत येईल. म्हणेजच प्रत्येक हंगामातील नोंदीसाठी स्वतंत्रपणे नांव नोंदणी करणे आवश्यक आहे.

६) वरील पुरस्कारासाठी पात्र होणेकरिता हंगामानुसार कमीतकमी उत्पादन खालील प्रमाणे ग्राह्य धरणेत येईल. आणि नंतर उत्पादनानुसार उतरत्या क्रमाने क्रमांक निवडले जातील.

(१) आडसाली ९० मे.टन/एकर
(२) पुर्व हंगामासाठी ८० मे.टन/एकर
(३) सुरू ७५ में. टन/एकर
(४) खोडवा ६५ मे.टन / एकर

सदर योजनेमध्ये भाग घेतलेले क्षेत्रास तोड आले नंतर लगेच ऊस विकास विभागाशी संपर्क साधावा. सदर राबविलेल्या प्रोत्साहनपर बक्षिस योजनेमध्ये बदल करणे अथवा रद्द करणेचा अधिकार संचालक मंडळास राहतील. कारखान्याने राबविलेल्या प्रोत्साहनपर बक्षिस योजनेमध्ये भाग घेणेसाठी वरील नियमाचे पालन करणे आवश्यक आहे.

तरी सर्व सभासदांनी वरील प्रमाणे प्रोत्साहनपर बक्षीस योजनेत आपले नांव नोंदणी करून या योजनेत भाग घ्यावा.

* आपले विश्वासू *

(राजेंद्र ना.यादव)
कार्यकारी संचालक

(लालासो ध.माळशिकारे)
व्हा.चेअरमन
व
संचालक मंडळ

(पुरूषोत्तम रा. जगताप)
चेअरमन